**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**


राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे-४११ ००१


राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठातर्फे 'विशेष अपील निर्गत कार्यक्रम' दि.१८.०६.२००८ रोजी सोलापूर येथे आयोजित करण्यात आला होता. त्यात खालील अपिलाचा समावेश होता :

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ३५३ / सोलापूर | उपस्थिती |
| २ | अपीलकर्ता | श्री. किसनराव सुब्राव देशमुख<br>ग्रामपंचायत शाळा हिंगणी रोड, वैराग,<br>ता. बार्शी, जि. सोलापूर | गैरहजर |
| ३ | जन माहिती अधिकारी | उप अभियंता (बांधकाम), जिल्हा परिषद<br>उपविभाग, बार्शी, ता. बार्शी, जि. सोलापूर | हजर |
| ४ | अपिलीय प्राधिकारी | गट विकास अधिकारी, पंचायत समिती बार्शी,<br>ता. बार्शी, जि. सोलापूर | हजर |

श्री. किसनराव सुब्राव देशमुख यांनी मौजे लोडोळे-मुंगशी रोडवरील रस्ता रूंदीकरणामध्ये पीळ घालून मोरी करून सोडलेले पाणी बंद करण्याबाबत दिलेली तक्रार व त्या संदर्भात १ ते ९ मुद्दयांची माहिती जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता (बांधकाम ), बार्शी यांच्याकडे मागितली होती. माहिती मिळाल्याने समाधानी असल्याचे अपीलकर्त्याने दि. १५.११.२००६ रोजीच्या पत्रान्वये अपिलीय प्राधिकारी यांना कळविले. आपल्या तक्रारीचे निराकरण झाल्याचे श्री. देशमुख यांनी पत्रात नमूद केले आहे.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

पुणे
दि. 30.७.२००८

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे-४११ ००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठातर्फे 'विशेष अपील निर्गत कार्यक्रम' दि.१७.०६.२००८ रोजी सोलापूर येथे आयोजित करण्यात आला होता. त्यात खालील अपिलाचा समावेश होता :

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ३५७ / सोलापूर | उपस्थिती |
| २ | अपीलकर्ता | श्री. ज्ञानेश्वर कृष्णांत माळवदकर<br>५अ, आजी सैनिक नाविक वैमानिक कुटुंबिय सहकारी गृहनिर्माण संस्था, विजापूर रोड, सोलापूर - ४१३ ००४ | गैरहजर |
| ३ | जन माहिती अधिकारी | उपनिबंधक सहकारी संस्था,<br>सोलापूर शहर, सोलापूर | हजर |
| ४ | अपिलीय अधिकारी | जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, सोलापूर | हजर |

अपीलकर्ता श्री. ज्ञानेश्वर कृष्णांत माळवदकर यांनी आजी सैनिक नाविक वैमानिक कुटुंबिय सहकारी गृहनिर्माण संस्था, सोलापूर या संस्थेने नवीन सभासद घेण्यापूर्वी महसूल व वनविभाग शासन निर्णयानुसार कब्जेहक्काची रक्कम जिल्हाधिकारी, सोलापूर यांच्याकडे भरलेल्या रकमेचा सविस्तर तपशील व इतर चार मुद्दयांची माहिती जन माहिती अधिकारी तथा उपनिबंधक सहकारी संस्था, सोलापूर शहर यांच्याकडे मागितली होती. अपीलकर्त्यास माहिती दिल्याचे जन माहिती अधिकारी यांनी लेखी निवेदन दिले आहे. तथापि अपीलकर्ते यांचे निधन झाले आहे, असे जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी यांनी लेखी नमूद केले आहे.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

पुणे
दि. २९.७.२००८

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम-१९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठातर्फे 'विशेष अपील निर्गत कार्यक्रम' दि.२६.०५.२००८ रोजी पुणे येथे आयोजित करण्यात आला होता. त्यात खालील अपिलाचा समावेश होता :

| | | |
|---|---|---|
| १. | अपील क्रमांक | ३६१ / पुणे |
| २ | अपीलकर्ता | श्री. अभिमन्यू पोपट गव्हाणे<br>मु.पो.डिंग्रजवाडी, ता. शिरुर जि.पुणे |
| ३ | जन माहिती अधिकारी | निवासी नायब तहसीलदार,<br>तहसील कार्यालय, शिरुर, ता. शिरुर, जि.पुणे |
| ४ | अपिलीय प्राधिकारी | तहसीलदार, शिरुर, ता. शिरुर, जि.पुणे |

अपीलकर्ता श्री. अभिमन्यू पोपट गव्हाणे यांनी जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे यांच्या कृषीशाखेच्या दि. ३०.१.२००६ रोजीच्या पत्रावरील कार्यवाहीची माहिती मागितली होती.

सदरहू पत्र हे तालुका कृषि अधिकारी, शिरूर, जि. पुणे यांच्याकडे उचित कार्यवाहीसाठी दि. ८.२.२००६ रोजी पाठविले असल्याचे जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, शिरुर यांनी त्यांना कळविले. अपिलीय प्राधिकारी तथा तहसीलदार, शिरूर यांनी जन माहिती अधिकाऱ्यांची माहिती योग्य ठरवून अपील निकाली काढले. मात्र दोन वर्षे होऊन गेल्यावरही त्या पत्रावरील कार्यवाहीची पूर्ण माहिती अपीलकर्त्यास दिली गेलेली नाही. माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मध्ये अभिप्रेत असलेल्या; सार्वजनिक प्राधिकरणांमधील पारदर्शकतेच्या व माहितीसमृध्द समाजनिर्मितीच्या तत्त्वांशी हे विसंगत आहे. अतिवृष्टीमुळे आपल्या पिकांची हानी झाल्याचे पंचनामे होऊनही भरपाई मिळालेली नाही, ती मिळावी, हा श्री. गव्हाणे यांचा मूळ विषय आहे. ही मागणी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कक्षेत येत नसली, तरी त्याबाबत काय कार्यवाही झाली, हे जाणून घेण्याचा नागरिकांचा हक्क आहे.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

# <u>आदेश</u>

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. तालुका कृषि अधिकारी, शिरूर यांच्याकडे दि. ८.२.२००६ रोजी पाठविलेल्या श्री. अभिमन्यू पोपट गव्हाणे यांच्या संदर्भात जिल्हाधिकारी, पुणे कार्यालयातील गृहशाखेच्या दि. ३०.१.२००६ च्या पत्रावरील कार्यवाहीची संपूर्ण माहिती हा आदेश मिळाल्यापासून दहा दिवसांत तालुका कृषि अधिकारी यांच्याकडून घेऊन अपीलकर्त्यास निःशुल्क द्यावी. अपिलीय प्राधिकारी तथा तहसीलदार, शिरूर यांची ही जबाबदारी राहील. त्याचा पूर्तता अहवाल त्यांनी दि. ३०.७.२००८ पर्यंत आयोगाला सादर करावा.

**पुणे**
दि. २१.७.२००८

**( विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठातर्फे 'विशेष अपील निर्गत कार्यक्रम' दि.२६.०५.२००८ रोजी पुणे येथे आयोजित करण्यात आला होता. त्यात खालील अपिलाचा समावेश होता :

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ३७७ / पुणे | उपस्थिती |
| २ | अपीलकर्ता | श्री.बाळासाहेब श्रीरंग कांबळे<br>१०, शिवम अपर्टिमेंट, विनायक नगर,<br>नवी सांगवी, पुणे-२७ | गैरहजर |
| ३ | जन माहिती अधिकारी | माहिती अधिकारी, पुणे विद्यापीठ, पुणे-७<br>श्री. रा.व्ही. चव्हाण | हजर |
| ४ | अपिलीय अधिकारी | कुलसचिव, पुणे विद्यापीठ, पुणे-७<br>श्री. एम. एल. जाधव | हजर |

अपीलकर्ता श्री. बाळासाहेब श्रीरंग कांबळे यांनी पी.ई. सोसायटी संचलित मॉडर्न कला, विज्ञान, वाणिज्य महाविद्यालय, पुणे यांच्या संबंधात एकूण १३ मुद्दयांची माहिती मागितली होती.

जन माहिती अधिकाऱ्यांने अ.क्र.१२ व १३ मुद्दयांच्या माहितीसाठी एकूण ०४ रू. भरण्याबाबत कळविले व उर्वरित माहिती संबंधित महाविद्यालयाकडून घ्यावी, असे दि. १८.९.२००६ रोजी कळविले. त्यानंतर प्रथम अपिलाच्या अनुषंगाने निर्णय न झाल्याने अपीलकर्त्याने आयोगाकडे अपील केले आहे.

जन माहिती अधिकाऱ्याने पाच दिवसांत संबंधित अर्ज मॉडर्न कला, विज्ञान, वाणिज्य महाविद्यालयाकडे पाठविणे आवश्यक होते. मात्र जन माहिती अधिकाऱ्यांनी कळविल्यानंतर अपीलकर्त्याने महाविद्यालयाकडे माहिती मागणे अधिक उचित ठरले असते.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

<u>आदेश</u>

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.
२. अपिलीय प्राधिकारी यांना अपील निर्णय विहित मुदतीत घेणेबाबत समज देण्यात येत आहे.

पुणे
दि. २४/७/२००८

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अवये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
कौंसिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठातर्फे 'विशेष अपील निर्गत कार्यक्रम' दि. २६.०५.२००८ रोजी पुणे येथे आयोजित करण्यात आला होता. त्यात खालील अपीलांचा समावेश होता :

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ३८० /पुणे | उपस्थिती |
| २ | अपीलकर्ता | श्री.शरद रामाण्णा शेट्टी,<br>१४ वीरभद्र नगर, बाणेर, पुणे ४५ | गैरहजर |
| ३ | जन माहिती अधिकारी | उपअधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क, पुणे-११ | हजर |
| ४ | अपिलीय प्राधिकारी | अधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क, पुणे-११ | गैरहजर |

अपीलकर्ता यांनी श्री. शरद रामण्णा शेट्टी यांनी जन माहिती अधिकाऱ्यांकडे त्यांच्या कार्यालयाच्या कर्यप्रणाली व कार्यालयाच्या अपिलीय अधिकाऱ्यांची नावे, तसेच अन्य अधिकारी व कर्मचाऱ्यांची माहिती मागितली होती.

माहितीसाठी दि. ३०.६.२००६ रोजीच्या पत्रान्वये रू. २३३/- एवढे शुल्क भरण्याबाबत कळविण्यात आले होते. परंतु अपीलकर्त्याने शुल्क भरले नाही. माहिती तयार असून शुल्क भरल्यानंतर माहिती देण्यात येईल, असे जन माहिती अधिकारी तथा उपअधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क, पुणे यांनी नमूद केले आहे. माहिती मागितल्यानंतर माहितीचे शुल्क भरून सदर माहिती अपीलकर्त्याने घेऊन जाणे आवश्यक आहे, तसे न करता अपील करणे ही अनेक यंत्रणाचा वेळ व श्रम वाया घालविणारी कृती आहे. त्याबद्दल अपीलकर्त्यास समज देण्यात येत आहे.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.
२. माहिती मागितल्यानंतर माहितीचे शुल्क भरून सदर माहिती अपीलकर्त्याने प्राप्त करून घ्यावी.

पुणे
दि. ०८.७.२००८

**( विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठातर्फे 'विशेष अपील निर्गत कार्यक्रम' दि. २७.५.२००८ रोजी पुणे येथे आयोजित करण्यात आला होता. त्यात खालील अपिलाचा समावेश होता :

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ३८४ / पुणे | उपस्थिती |
| २ | अपीलकर्ता | श्री. शरद रामण्णा शेट्टी<br>१४, वीरभद्र नगर, बाणेर, पुणे-४५ | गैरहजर |
| ३ | जन माहिती अधिकारी | आरोग्य वैद्यकीय अधिकारी, पिंपरी-चिंचवड महानगरपालिका, पिंपरी, पुणे-१८ | हजर |
| ४ | अपिलीय प्राधिकारी | अतिरिक्त आयुक्त, पिंपरी-चिंचवड महानगरपालिका, पिंपरी, पुणे-१८ | हजर |

अपीलकर्ता श्री. शरद रामण्णा शेट्टी यांनी डॉ. एस.एन. जोग यांच्या सन २००३ ते २००६ या कालावधीतील वैद्यकीय उपचार व शस्त्रक्रियेच्या खर्चाची माहिती मागितली होती.

अपीलकर्त्यास आवश्यक असलेल्या माहितीसाठी अपीलकर्त्याने शुल्क रू. २/- भरणा न केल्याने माहिती दिली नाही. शुल्क भरल्यावर माहिती देण्याची तयारी आहे, असे जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी नमूद केले.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

पुणे
दि. २९.७.२००८

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र, पुणे खंडपीठ.

( विजय कुवळेकर )
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

११.६.०८

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठातर्फे 'विशेष अपील निर्गत कार्यक्रम' दि.२६.०५.२००८ रोजी पुणे येथे आयोजित करण्यात आला होता. त्यात खालील अपिलाचा समावेश होता :

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ३९५ / पुणे | उपस्थिती |
| २ | अपीलकर्ता | श्री. विठ्ठल नामदेवराव पवार<br>'नामवैभव' कर्नल पार्क, स.क्र. ३७/२/१/१,<br>सा.पुण्यमत कार्यालय, केशवनगर (मुंढवा) पुणे-३९ | गैरहजर |
| ३ | जन माहिती अधिकारी | माहिती अधिकारी,<br>श्री. छत्रपती शिक्षण संस्था, भवानीनगर, ता.इंदापूर,<br>जि.पुणे-४१३१०४ | हजर |
| ४ | अपिलीय प्राधिकारी | अपिलीय प्राधिकारी, सचिव श्री.छत्रपती शिक्षण संस्था, भवानीनगर, ता.इंदापूर, जि.पुणे -४१३ १०४ | गैरहजर |

अपीलकर्ता श्री. विठ्ठल नामदेवराव पवार यांनी श्री छत्रपती शिक्षण संस्था, भवानीनगर, इंदापूर या संस्थेच्या सन २००३ ते २००६ या आर्थिक वर्षातील अनुदानातून करण्यात आलेल्या खर्चाच्या अनुषंगाने माहिती विचारली होती.

सदरहू माहिती तयार असल्याने व्यक्तिशः अपीलकर्त्याने माहिती घेऊन जावी, असे दि. २०.९.२००६ रोजीच्या पत्रान्वये जन माहिती अधिकाऱ्यांनी कळविले होते. परंतु अपीलकर्त्याने माहिती घेतली नाही. तसेच प्रथम अपिलीय प्राधिकाऱ्यांकडे प्रथम अपील न करता आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता विशेष अपील निर्गत कार्यक्रमातही गैरहजर असून लेखी निवेदनही सादर केलेले नाही. माहिती मागून ती न घेण्याची अपीलकर्त्याची कृती योग्य नाही.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**<u>आदेश</u>**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

पुणे
दि. २.७.२००८

**( विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठातर्फे 'विशेष अपील निर्गत कार्यक्रम' दि.२६.०५.२००८ रोजी पुणे येथे आयोजित करण्यात आला होता. त्यात खालील अपिलाचा समावेश होता :

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ३९७ / पुणे | उपस्थिती |
| २ | अपीलकर्ता | डॉ.सुनिल धापटे<br>सी-३/१५, डीएसके, चिंतामणी,<br>आप्पा बळवंत चौक, शनिवार पेठ, पुणे-३० | गैरहजर |
| ३ | जन माहिती अधिकारी | माहिती अधिकारी, महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, १७, डॉ.आंबेडकर मार्ग, पुणे १ | हजर |
| ४ | अपिलीय प्राधिकारी | आयुक्त, महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, १७, डॉ.आंबेडकर मार्ग, पुणे-१ | हजर |

अपीलकर्ता डॉ. सुनिल धापटे यांनी त्यांचे पाल्य सोहम सु. धापटे यांच्या माध्यमिक शाळा शिष्यवृत्ती परीक्षा २००६ मधील भाषा, समाजशास्त्र, बुध्दिमत्ता चाचणी व सामान्य विज्ञान या उत्तरपत्रिकांची सत्यप्रत मागितली होती.

प्रस्तुत अपिलाच्या अनुषंगाने प्राप्त झालेली कागदपत्रे पाहता व उत्तरपत्रिकांच्या प्रती देण्याबाबत विविध न्यायालयांनी दिलेले निकाल लक्षात घेता अपिलीय प्राधिकारी तथा आयुक्त, महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे यांनी दि. ५.९.२००६ रोजी घेतलेला उत्तरपत्रिकांच्या सत्यप्रती न देण्याचा निर्णय कायम ठेवण्यात येत आहे.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

पुणे
दि. ०५.०९.२००८

(विजय कुवळेकर)
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे-४११ ००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठातर्फे 'विशेष अपील निर्गत कार्यक्रम' दि.१७.०६.२००८ रोजी सोलापूर येथे आयोजित करण्यात आला होता. त्यात खालील अपिलाचा समावेश होता :

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ४०४ / सोलापूर | उपस्थिती |
| २ | अपीलकर्ता | श्री. शंकर उमाजी साळुंके<br>मु.पो. अकलूज, आझाद चौक,<br>ता. माळशिरस, जि. सोलापूर | हजर |
| ३ | जन माहिती अधिकारी | सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, अकलूज<br>ता. माळशिरस, जि. सोलापूर | हजर |
| ४ | अपिलीय अधिकारी | जिल्हा निबंधक, सहकारी संस्था, सोलापूर | हजर |

दि बॅकवर्ड क्लास को.ऑप.हौ. सोसायटीचे मूळ सभासदांना मूळ नकाशाप्रमाणे जागा वाटप करण्यात आले आहे का, आले असल्यास कागदपत्रांच्या नकाशाच्या सांक्षाकित प्रती, जागा वाटप नकाशाप्रमाणे केले नसल्यास त्याचा लेखी खुलासा, सदर सोसायटीचे लेखापरीक्षण किती सालापर्यंत करण्यात आले व तेथून पुढे का करण्यात आले नाही, सदर सोसायटी स्थापन झाल्यापासून आलेला निधी किती व तो कशाप्रकारे खर्च करण्यात आला, त्यासंबंधीची सर्व कागदपत्रे, साक्षांकित प्रतीत अपीलकर्ता श्री. शंकर उमाजी साळुंके यांनी जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, अकलूज यांच्याकडे मागितली होती. कार्यालयात उपलब्ध व कार्यालयाशी संबंधित सर्व माहिती अपीलकर्त्यास दिली असून ऊर्वरित माहिती संस्थेशी संबंधित असल्याने संबंधित संस्थेस दि. २७.११.२००६ रोजी कळवून अर्ज संस्थेकडे पाठविला असल्याचे जन माहिती अधिकारी यांनी नमूद केले. प्रथम अपील दाखल केलेले नाही. अपील अर्जाची प्रत विशेष अपील निर्गत कार्यक्रम दि. १७.६.२००८ रोजी अपीलकर्त्याकडून घेतली असून पुढील कार्यवाही करण्यात येईल, असे अपिलीय अधिकारी तथा जिल्हा निबंधक, सहकारी संस्था, सोलापूर यांनी लेखी नमूद केले आहे.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

# आदेश

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. अपीलकर्त्यांस संबंधित संस्थेकडून माहिती आठ दिवसात निःशुल्क उपलब्ध करून द्यावी. ही जबाबदारी अपिलीय प्राधिकारी तथा जिल्हा निबंधक, सहकारी संस्था, सोलापूर यांची राहील. संस्थेने या मुदतीत माहिती न दिल्यास अपिलीय प्राधिकारी तथा जिल्हा निबंधक, सहकारी संस्था, सोलापूर यांनी त्यांच्या अधिकारांतर्गत योग्य ती प्रशासकीय कारवाई करावी. हा आदेश मिळाल्यापासून पंधरा दिवसात अपिलीय प्राधिकारी यांनी आयोगास पूर्तता अहवाल सादर करावा.

पुणे
दि. ३१ [illegible]

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठातर्फे 'विशेष अपील निर्गत कार्यक्रम' दि.२९.०५.२००८ रोजी पुणे येथे आयोजित करण्यात आला होता. त्यात खालील अपिलाचा समावेश होता :

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ४१२ / पुणे |
| २ | अपीलकर्ता | श्री.पंढरीनाथ सर्जेराव कामथे<br>कामथे निवास, जे.पी.नगर, गव्हाणे वस्ती ,भोसरी, पुणे ३९ |
| ३ | जन माहिती अधिकारी | जन माहिती अधिकारी ,<br>पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक मर्या., शाखा शिवरी स्टँड,<br>ता.पुरंदर, जि.पुणे |
| ४ | अपिलीय प्राधिकारी | अपिलीय अधिकारी<br>पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक मर्या., शाखा शिवरी स्टँड,<br>ता. पुरंदर, जि.पुणे |

अपीलकर्ता श्री. पंढरीनाथ सर्जेराव कामथे यांनी पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक मर्या., शाखा शिवरी स्टँड, ता. पुरंदर, जि. पुणे यांच्याकडून कर्ज वाटपाच्या अनुषंगाने माहिती मागितली होती.

वरील तीनही घटकांमधील चर्चा, त्यांनी सादर केलेली निवेदने व चर्चेअंतीचा निष्कर्ष पाहता अपीलकर्त्याने या अनुषंगाने राज्य माहिती आयोग, मुंबई येथे अपील दाखल केले होते. सदर अपिलावर राज्य मुख्य माहिती आयुक्त, मुंबई डॉ. सुरेश जोशी यांनी दि. ९.११.२००६ रोजी आदेश दिले. त्या अनुषंगाने माहिती न मिळाल्याने अपीलकर्त्याने आयोगाकडे पुन्हा अपील केले. परंतु बँक व्यवस्थापनाकडून माहिती दि. [illegible].११.२००६ रोजी व शिवरी विविध कार्यकारी सेवा सोसायटी लि., या संस्थेने दि. [illegible].२००६ रोजी माहिती दिली असल्याचे जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी नमूद केले. त्यानुसार माहिती मिळाली असल्याचे अपीलकर्त्यांने मान्य केले.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

पुणे
दि. २५ .७.२००८

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठातर्फे 'विशेष अपील निर्गत कार्यक्रम' दि.२६.०५.२००८ रोजी पुणे येथे आयोजित करण्यात आला होता. त्यात खालील अपिलाचा समावेश होता :

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ४१४ / पुणे | उपस्थिती |
| २ | अपीलकर्ता | श्री.दत्तात्रय बंडू जगताप<br>२०, विजय को ऑप हौसिंग सोसायटी,<br>१३२ ए/१, शिवाजीनगर, पुणे.१६ | गैरहजर |
| ३ | जन माहिती अधिकारी | निवासी उपजिल्हाधिकारी,<br>जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे-१ | हजर |
| ४ | अपिलीय प्राधिकारी | जिल्हाधिकारी, पुणे | हजर |

अपीलकर्ता श्री. दत्तात्रय बंडू जगताप यांनी मागासवर्गीयांचे राहणीमान उंचविण्यासाठी शासनाने वेळोवेळी घेतलेल्या निर्णयांच्या अंमलबजावणीबाबत माहिती मागितली होती.

अपीलकर्त्यांचे निधन झाले असल्याचे जन माहिती अधिकाऱ्याने लेखी नमूद केले आहे.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**<u>आदेश</u>**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

पुणे
दि. ०८.७.२००८

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठातर्फे 'विशेष अपील निर्गत कार्यक्रम' दि.२६.०५.२००८ रोजी पुणे येथे आयोजित करण्यात आला होता. त्यात खालील अपिलाचा समावेश होता :

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ४१८ / पुणे | उपस्थिती |
| २ | अपीलकर्ता | श्री. दिनेश रघुनाथ सकपाळ व<br>श्री. बाळकृष्ण रामचंद्र सकपाळ,<br>घ.क्र.१४७, नागेश्वर गृह.संस्था, सहकारनगर,पुणे-९ | गैरहजर |
| ३ | जन माहिती अधिकारी | उपकार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनी मर्या., एस.टी.स्टँड जवळ, लोणावळे, ता.मावळ, जि.पुणे | हजर |
| ४ | अपिलीय प्राधिकारी | कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनी मर्या., संकलन व सुव्यवस्था विभाग, राजगुरुनगर, शापनी बिल्डिंग, वाडा रोड, ता.खेड, जि. पुणे | हजर |

श्री. दिनेश रघुनाथ सकपाळ यांनी लोणावळा नगर परिषद हद्दीतील मिळकत क्र.३२४ मध्ये जाण्यास अडथळा निर्माण झाल्याच्या अनुषंगाने माहिती मागितली होती. त्यावरील प्रथम अपील व द्वितीय अपील मात्र श्री. बाळकृष्ण रामचंद्र सकपाळ यांनी केले आहे.

प्रस्तुत माहिती ही माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत येत नाही. अपीलकर्ता श्री. बाळकृष्ण रामचंद्र सकपाळ यांना जन माहिती अधिकारी यांनी माहिती दिलेली आहे. परंतु त्यांची मूळ मागणी शेजाऱ्याला दिलेल्या वीजजोडासाठी आपल्या जागेत वीजमंडळाने उभारलेला पोल काढून टाकण्याबाबतची आहे. ही मागणी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कक्षेत येत नाही. मात्र गेली अनेक वर्षे प्रलंबित राहिलेला हा प्रश्न माहितीच्या अधिकारात धसाला लागल्यामुळे सुटल्याचे व आपली तक्रार राहिली नसल्याचे श्री. बाळकृष्ण रामचंद्र सकपाळ यांनी दि. १९.५.२००८ च्या पत्रान्वये आयोगाला कळविले आहे.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

<u>आदेश</u>

अपील निकाली काढण्यात येत आहे.

पुणे
दि. २४.७.२००८

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठातर्फे 'विशेष अपील निर्गत कार्यक्रम' दि. १२.६.२००८ रोजी पुणे येथे आयोजित करण्यात आला होता. त्यात खालील अपिलाचा समावेश होता :

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ४२०/ पुणे | उपस्थिती |
| २ | अपीलकर्ता | श्री. अनिरूध्द भाऊ चव्हाण<br>५६, तळजाई, सहकारनगर क्र.१, पुणे-९ | गैरहजर |
| ३ | जन माहिती अधिकारी | सहाय्यक वनसरंक्षक (प्रा) पुणे वनविभाग, पुणे यांचे कार्यालय, सेनापती बापट रोड, पुणे-४ | हजर |
| ४ | अपिलीय प्राधिकारी | वनसरंक्षक, पुणे वनविभाग, पुणे यांचे कार्यालय, सेनापती बापट रोड, पुणे-४ | प्रतिनिधी हजर |

उप वनसरंक्षक, पुणे यांच्या अधिपत्याखाली किती तालुक्यातील वन विभागाचे काम पाहिले जाते, १ ते ९९ वर्षांच्या कराराने अखत्यारीतील जमिनी कोणत्या व्यक्ती व संस्थांना दिल्या आहेत, आदी माहिती अपीलकर्ता श्री. अनिरूध्द भाऊ चव्हाण यांनी मागितली होती.

जन माहिती अधिकारी यांनी दि. २३.७.२००७ रोजीच्या पत्रान्वये एकूण रू.८२०/- शुल्क भरण्याबाबत कळविले. परंतु अपीलकर्त्याने शुल्क न भरता अपिलीय प्राधिकाऱ्यांकडे प्रथम अपील दाखल केले. त्यावर अपिलीय प्राधिकाऱ्यांनी कोणताही निर्णय घेतला नाही. तसेच जन माहिती अधिकाऱ्याने अपीलकर्त्यास शुल्क भरण्यास उशीरा कळविले आहे. याबाबत दोघांना समज देण्यात येत आहे. अपीलकर्त्यास सदरहु माहिती निःशुल्क देण्याचे जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी मान्य केले आहे.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. अपीलकर्त्यास आवश्यक ती माहिती निःशुल्क द्यावी. मात्र अपीलकर्त्याला आधी कळविलेले शुल्क शासकीय तिजोरीतून न भरता जन माहिती अधिकारी यांनी स्वतः भरावे. अपिलीय प्राधिकारी यांनी याचा पूर्तता अहवाल आयोगास दि. ११.८.२००८ पर्यंत सादर करावा.

पुणे
दि. ३० .७.२००८

(राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र, पुणे खंडपीठ — शिक्का)

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अवये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे : ४११ ००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठातर्फे 'विशेष अपील निर्गत कार्यक्रम' दि.२६.०५.२००८ रोजी पुणे येथे आयोजित करण्यात आला होता. त्यात खालील अपिलाचा समावेश होता :

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ४२१ /पुणे |
| २ | अपीलकर्ता | श्री.अनिरुध्द भाऊ चव्हाण<br>५६, तळजाई वसाहत, सहकारागर क्र.१, पुणे-९ |
| ३ | जन माहिती अधिकारी | विशेष भूसंपादन समन्वय अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे |
| ४ | अपिलीय प्राधिकारी | जिल्हाधिकारी , जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे |

अपीलकर्ता श्री. अनिरूध्द भाऊ चव्हाण यांनी विशेष भूसंपादन अधिकारी यांच्या अखत्यारीत किती तालुके येतात, पुणे जिल्ह्यात एकूण किती जमीनीचे संपादन झाले याबाबत तालुकानिहाय माहिती, तसेच १ ते १९ या वर्षात कराराने जमिनी कोणत्या निकषांवर संस्था, संघटना व व्यक्तींना प्रदान केल्या या संबंधित माहिती मागितली होती.

जन माहिती अधिकाऱ्यांकडे दि. ३१.८.२००८ रोजी माहिती अर्ज प्राप्त झाला होता. सदरहू अर्जात श्री. चव्हाण यांनी माहिती व्यक्तिशः मिळावी, असे नमूद केले होते. तसेच बरीचशी माहिती आपल्या कार्यालयाशी संबंधित नव्हती. ती विविध विभागांशी निगडीत असल्याने ती एकत्रित करून रू.१३४२/- भरण्याबाबत अपिलीय प्राधिकाऱ्यांनी दिलेल्या निर्णयानुसार कळविले होते. परंतु अपीलकर्त्याने शुल्क भरले नाही. दि. ५.१२.२००६ रोजी अपीलकर्त्यास माहिती निःशुल्क उपलब्ध करून दिलेली आहे, असे जन माहिती अधिकारी तथा विशेष भूसंपादन समन्वय अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे यांनी नमूद केले आहे. दि. १६.१०.२००६ रोजी श्री. चव्हाण यांनी अपिलीय प्राधिकारी तथा जिल्हाधिकारी, पुणे यांच्याकडे अपील केले. त्याचा निर्णय त्यांनी दि. २४.११.२००६ रोजी दिला. त्यापूर्वीच श्री. चव्हाण यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले, असे अपिलीय प्राधिकाऱ्यांनी निवेदनात नमूद केले आहे. माहिती व्यक्तिशः नेणार असल्याचे

श्री. चव्हाण यांनी अर्जात नमूद केले असले तरी ती तयार असल्याचे जन माहिती अधिकाऱ्यांनी त्यांना विहित मुदतीत कळविणे आवश्यक होते. तसेच मागितलेली माहिती अनेक विभागांशी संबंधित असल्यास अपीलकर्त्याने त्या त्या विभागांकडे अर्ज करून माहिती मागणे सुलभ प्रक्रियेच्या दृष्टीने अधिक योग्य ठरेल.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

पुणे
दि. 30.७.२००८

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठातर्फे 'विशेष अपील निर्गत कार्यक्रम' दि. २७.६.२००८ रोजी पुणे येथे आयोजित करण्यात आला होता. त्यात खालील अपिलाचा समावेश होता :

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ४२३ / पुणे | उपस्थिती |
| २ | अपीलकर्ता | श्री.दत्तात्रय बंडू जगताप<br>२०, विजय को ऑप हौसिंग सोसायटी, १३२ ए/१,<br>शिवाजीनगर, पुणे-१६ | गैरहजर |
| ३ | जन माहिती अधिकारी | उप निबंधक, सहकारी संस्था,<br>सहकार आयुक्त यांचे कार्यालय, पुणे-१ | हजर |
| ४ | अपिलीय प्राधिकारी | सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था,<br>पुणे -१ | हजर |

अपीलकर्ता श्री. दत्तात्रय बंडू जगताप यांनी विजय हरिजन सह हौसिंग सोसायटी, पुणे-१६ या संस्थेला शासनाकडून देण्यात आलेल्या जागेचा व अनुदानाच्या उपयोगितेबाबत माहिती मागितली होती.

अपीलकर्त्याचे निधन झाले असल्याचे जन माहिती अधिकाऱ्याने आयोगाकडे सादर केलेल्या निवेदनात नमूद केले आहे.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

पुणे
दि. १४.७.२००८

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

११.६.०८

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठातर्फे 'विशेष अपील निर्गत कार्यक्रम' दि. २३.०५.२००८ रोजी पुणे येथे आयोजित करण्यात आला होता. त्यात खालील अपिलांचा समावेश होता :

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ४२४ / पुणे | उपस्थिती |
| २ | अपीलकर्ता | श्री.सुधीर माधव जोशी<br>बिल्डिंग क्र.२, फ्लॅट क्र.१५, ५८७, दत्तप्रसाद सोसायटी, पुणे सिंहगड रोड, पुणे -३० | गैरहजर |
| ३ | जन माहिती अधिकारी | जन माहिती अधिकारी, जनता सहकारी बँक लि.<br>१४४४, शुक्रवार पेठ, पुणे-२ | प्रतिनिधी हजर |
| ४ | अपिलीय प्राधिकारी | अपिलीय प्राधिकारी जनता सहकारी बँक लि.<br>१४४४, शुक्रवार पेठ, पुणे-२ | प्रतिनिधी हजर |

अपीलकर्ता श्री. सुधीर माधव जोशी यांनी दोन स्वतंत्र अर्जान्वये अनुक्रमे संगणकांच्या अनुषंगाने व भारतीय रिझर्व बँकेच्या निर्णयांच्या अनुषंगाने माहिती मागितली होती.

माहितीचा अधिकार अधिनियम सदर बँकेला लागू होत नाही, असे जन माहिती अधिकारी, अपिलीय प्राधिकारी व सदर बँकेचे वरिष्ठ अधिकारी, विधी-वसुली विभाग यांनी निवेदनात नमूद केले आहे. नागरी सहकारी बँकांना माहितीचा अधिकार अधिनियम २००५ लागू होत नाही, असे सहकार आयुक्तांच्या परिपत्रकात म्हटले असून राज्य मुख्य माहिती आयुक्त डॉ. सुरेश जोशी यांनी ते मान्य केले आहे. त्यानुसार पूर्व 'जैसे थे' स्थिती ठेवण्याचा आयोगाचा निर्णय असल्यामुळे बँकेचे म्हणणे मान्य करण्यात येत आहे.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

पुणे
दि. ३०.७.२००८

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठातर्फे 'विशेष अपील निर्गत कार्यक्रम' दि.२६.०५.२००८ रोजी पुणे येथे आयोजित करण्यात आला होता. त्यात खालील अपिलाचा समावेश होता :

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ४२५ / पुणे | उपस्थिती |
| २ | अपीलकर्ता | श्री.सोनोपंत भागूजी दांगट<br>चैतन्य कृष्णानगर, रोड नं.२, नवी सांगवी, पुणे २७ | हजर |
| ३ | जन माहिती अधिकारी | सह दुय्यम निबंधक, हवेली क्र.२. पुष्पमंगल इमारत,<br>शेठनारायणदास दुगड चौक, बिबवेवाडी कॉर्नर, पुणे २७ | हजर |
| ४ | अपिलीय अधिकारी | सह दुय्यम निबंधक हवेली क्र.२, पुष्पमंगल इमारत,<br>शेठनारायणदास, दुगड चौक, बिबवेवाडी कॉर्नर, पुणे.२७ | हजर |

अपीलकर्ता श्री. सोनोपंत भागूजी दांगट यांनी दस्त क्र.४५०९/८५ ( दि. ३०.४.१९८५ ) ची साक्षांकित प्रत दि. ५.१.२००६ रोजी जन माहिती अधिकारी तथा सह दुय्यम निबंधक, हवेली क्र.२, पुणे यांच्याकडे मागितली होती.

जन माहिती अधिकाऱ्यांनी सादर केलेल्या रोकड वहीचा नमुना व जन माहिती अधिकारी यांचे निवेदन पाहता अपीलकर्त्यास दि. १३.८.२००७ रोजी मूळ दस्त (क्र.४५०९/८५) दिला असल्याचे दिसते. मात्र त्यापूर्वी साक्षांकित प्रत जन माहिती अधिकारी यांनी देणे आवश्यक होते.

अपीलकर्त्यांच्या माहिती अर्ज व प्रथम अपील यावर जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी विहित मुदतीत कार्यवाही केली पाहिजे, याची समज या दोघांनाही देण्यात येत आहे.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

<u>आदेश</u>

अपील निकाली काढण्यात येत आहे.

पुणे
दि. 25.६.२००८

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला, कौंसिल
हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.सुरेश विठ्ठल जोरकर
बिल्डिंग नं.३, रुम नं.९, गव्हर्नमेंट इरिगेशन कॉलनी,
येरवड पोस्ट ऑफिससमोर, येरवडा, पुणे-६ अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा जिल्हा उपनिबंधक,
सहकारी संस्था, पुणे उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा चेअरमन, दि गव्हर्नमेंट सर्व्हंटस महाराष्ट्र
को-ऑप.क्रेडिट सोसायटी, पुणे-३०

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ४४७+१६३ / पुणे / २००६ |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २१.५.२००८ |

**३. उपस्थित**

**अपिलीय प्राधिकारी** तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, पुणे श्री.प्रकाश रामचंद्र नानगुडे

**जन माहिती अधिकारी** तथा चेअरमन, दि गव्हर्नमेंट सर्व्हंटस् महाराष्ट्र को-ऑप.क्रेडिट सोसायटी, पुणे-३० श्री.सुनील देशमुख

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ९.१०.२००५ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. २२.११.२००७ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. २७.१.२००६ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. १८.२.२००६ |

| ८ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**<br><br>माहे जून २००५ मध्ये कर्ज मंजूर केलेल्या व नामंजूर केलेल्या सभासदांची यादी व नामंजूर केल्याची कारणे. तसेच कर्ज मंजूर केलेल्या व नामंजूर केलेल्या सभासदांचे जून-२००४ ते जून २००५ पर्यंत भरलेल्या हप्त्यांचा तपशील दर्शविणारा रजिस्टरमधील नोंदीची छायांकित प्रत चेअरमन यांच्या सहीने. |
|---|---|

## विवेचन

अपीलकर्ता श्री.सुरेश विठ्ठल जोरकर यांनी जन माहिती अधिकारी तथा चेअरमन, दि गव्हर्नमेंट सर्व्हंटस् महाराष्ट्र को-ऑप.क्रेडिट सोसायटी, पुणे-३० या संस्थेकडून माहे जून २००५ मध्ये कर्ज मंजूर केलेल्या व नामंजूर केलेल्या कारणांसह सभासदांची यादी व सभासदांनी जून २००४ ते जून २००५ पर्यंत भरलेल्या हप्त्यांचा रजिस्टरमधील नोंदीच्या प्रती चेअरमन यांच्या सहीनिशी मागितल्या होत्या. त्या जन माहिती अधिकारी यांनी न दिल्याने त्यांनी प्रथम अपील केले व ते फेटाळण्यात आले आहे. त्यावर व्यथित होऊन त्यांनी आयोगाकडे अपील केले आहे.

जन माहिती अधिकारी तथा संस्थेचे सचीव यांनी दि.१३.११.२००५ च्या पत्राने उत्तर दिले. सहकार कायद्याप्रमाणे अपीलकर्ता हे स्वतःच्या खात्यापुरती माहिती मागवू शकतील व आवश्यक शुल्क भरुन ती घेऊन जावी, असे त्यांनी कळविले.

आपण आपली वैयक्तिक माहिती मागविलीच नव्हती. इतर कर्जदारांची माहिती हवी होती व ती मिळणे आवश्यक होते. इतरांना थकबाकीदार असतानाही कर्ज देण्यात आले, आपल्याला मात्र आकसापोटी डावलण्यात आले आहे, असे श्री.जोरकर यांनी लेखी निवेदनात म्हटले आहे. सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्याकडील जावक क्र.अवनि/मेमाअ/शाप्राअ/२००६, दि.८.२.२००६ या पत्रानुसार माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कायदा लागू होत नाही. त्यामुळे अपीलकर्ता यांना माहिती देणे बंधनकारक नाही. अर्जदाराची कर्जाची मागणी होती व ते थकबाकीदार असल्याने त्यांचे कर्जप्रकरण नामंजूर केले

त्यामुळे ते अशा स्वरुपाचे अर्ज करीत आहेत, असे प्रतिपादन संस्थेचे अध्यक्ष श्री.प्रकाश रामचंद्र नानगुडे यांनी केले.

पतसंस्थेला माहितीचा अधिकार अधिनियम २००५ लागू नसल्याचे राज्य मुख्य माहिती आयुक्त डॉ.सुरेश जोशी यांनी अन्य अपिलात मान्य केले आहे. तोच निर्णय आयोग तूर्त कायम करीत आहे.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(विजय कुंवळेकर)
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि.१४.७.२००८**

**july-०८ solapursangli४०-४२**